महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९ वे | दिनांक : २८/१२/२०२५ | वार : रविवार

## पुण्यात राष्ट्रवादीची युती तुटली: शिंदे-अजित पवार जवळ येणार?

**पुणे** : नुकत्याच पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचं प्राथमिक सूत्र ठरवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे महापालिकेत एकूण १६५ जागा असून, त्यापैकी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांनी प्रत्येकी ५० जागांवर निवडणूक लढवण्यावर तिन्ही पक्षांमध्ये प्राथमिक एकमत झालं आहे. उरलेल्या १५ जागा या वंचित बहुजन आघाडी आणि आम आदमी पक्षासाठी खुल्या ठेवण्याची तयारी या तिन्ही पक्षांनी दर्शवली आहे. महाविकास आघाडी अधिक व्यापक करण्यासाठी वंचित आणि आपचा समावेश करून घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचंही या बैठकीत स्पष्ट करण्यात आलं.

महाविकास आघाडीत नव्या पक्षांना सामावून घेण्याचा प्रयत्न असला, तरी वंचित बहुजन आघाडीने थेट २८ जागांची मागणी केल्यामुळे ही चर्चा सध्या अडचणीत सापडली आहे. वंचितची ही मागणी आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्षांना मान्य होईल का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे वंचित महाविकास आघाडीत सहभागी होणार की नाही, यावर सध्या प्रश्नचिन्ह आहे. दुसरीकडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबाबतही महत्त्वाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मनसेला स्वतंत्र कोटा न देता, शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आपल्या वाट्यातून काही जागा देण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे. यामुळे पुण्यातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहेत.

दरम्यान, पुणे महापालिकेत एकत्र निवडणूक लढवण्याबाबत सुरू असलेली दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांची चर्चा अखेर फिस्कटल्याचं स्पष्ट झालं आहे. शुक्रवारी झालेल्या चर्चांमध्ये अजित पवार गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ ३० ते ३५ जागा देऊ केल्याची आणि घड्याळ या निवडणूक चिन्हावरच निवडणूक लढण्याची अट घातल्याची माहिती समोर आली. ही अट शरद पवार गटाला मान्य नसल्यामुळे ही संभाव्य युती तुटली. याच पार्श्वभूमीवर शरद पवार गटाचे नेते अंकुश काकडे आणि विशाल तांबे हे काल रात्री झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहिले होते. त्यानंतर पुणे महापालिकेची निवडणूक आम्ही महाविकास आघाडीतूनच लढणार असल्याचं स्पष्ट विधान अंकुश काकडे यांनी केलं आहे.

**राष्ट्रवादी आणि शिंदे गटाच्या युतीच्या चर्चांना वेग**

पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी वेगळ्या वाटेवर जात असतानाच, अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी आणि शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये संभाव्य युतीच्या चर्चांना वेग आला आहे. पुणे महानगरपालिकेत ही नवी युती आकाराला येऊ शकते, अशी शक्यता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र धंगेकर यांनी व्यक्त केली आहे. भाजप आणि शिवसेना यांच्यात जागावाटपावरून अजूनही ठोस निर्णय होत नसल्याने, अजित पवार गट आणि शिंदे गट एकत्र लढण्याच्या पर्यायावर विचार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. भाजपकडून मानपान नको, मात्र कार्यकर्त्यांचा अपमानही नको, अशी भूमिका आम्ही वरिष्ठांपुढे मांडली असल्याचंही धंगेकर यांनी स्पष्ट केलं. कार्यकर्त्यांना योग्य संधी मिळावी, हीच आमची अपेक्षा असल्याचं त्यांनी सांगितलं असून, दुपारपर्यंत शिवसेना शिंदे गटाची भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

**पिंपरी-चिंचवडमध्ये वेगवेगळ्या राजकीय घडामोडी**

पुण्याच्या उलट चित्र पिंपरी-चिंचवडमध्ये दिसून येत आहे. तेथे केवळ निवडणूक चिन्हामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी तुटणार नसल्याचं संकेत मिळाले आहेत. अजित पवार गटाच्या शहराध्यक्षांनी एक पाऊल मागे घेत, शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तुतारी या चिन्हावर लढायचं असेल तर घड्याळाचा आग्रह धरणार नाही, अशी भूमिका जाहीर केली आहे. जागावाटपामुळे आघाडी तुटू नये, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. शहराध्यक्ष योगेश बहल यांनी तर थेट विधान करत, अजित पवारांनी जर शरद पवार गटाच्या सुलक्षणा शिलवंत यांना माझ्या प्रभागातून उमेदवारी देण्यास सांगितलं, तर मी स्वतः निवडणूक लढवणार नाही, असं म्हटलं आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं असलं, तरी अधिकृत घोषणा होईपर्यंत या चर्चांवर विश्वास ठेवायला अनेकजण तयार नाहीत. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये वेगवेगळ्या राजकीय घडामोडींमुळे निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## मंगेश काळोखे हत्या प्रकरण : एकनाथ शिंदेंनी घेतली कुटुंबीयांची भेट



**मुंबई** : रायगड जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय संघर्ष आता टोकाचा आणि हिंसक वळणावर पोहोचला आहे खोपोली येथील शिवसेनेच्या महिला नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची भरचौकात निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सरचिटणीस सुनील तटकरे यांच्या घरी काळोखेंच्या हत्येचा प्लॅन ठरला, असा खळबळजनक आरोप शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला. दरम्यान, या घटनेची गांभीर्याने दखल घेत शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी काळोखे हत्याकांडप्रकरणी सुनील तटकरेंवर खळबळजनक आणि गंभीर आरोप केलेत. आरोपी रवींद्र देवकर याने हत्येच्या चार-पाच दिवसांपूर्वी सुतारवाडी येथे जाऊन सुनील तटकरे यांची भेट घेतली होती, असा दावा महेंद्र थोरवे यांनी केला आहे. "रायगडमध्ये सुनील तटकरे यांनी रक्तरंजित राजकारण सुरू केले असून विरोधकांच्या हत्या त्यांच्या सांगण्यावरून केल्या जात आहेत. तटकरे हेच रायगडचा 'आका' बनले आहेत," असा खळबळजनक आरोप महेंद्र थोरवे यांनी केला.

या हत्येत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांचाही सहभाग असून, सुधाकर घारे आणि रवींद्र देवकर यांनी 'प्री-प्लॅन' करूनच मंगेश काळोखे यांना संपवल्याचा आरोप महेंद्र थोरवे यांनी केला आहे. जोपर्यंत सुधाकर घारेसह १० आरोपींना अटक होत नाहीत, तोपर्यंत आम्ही हटणार नाही. याप्रकरणी पोलिस स्टेशनवर ठिय्या आंदोलन करू, असा इशाराही थोरवे दिला आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज काळोखे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. उपमुख्यमंत्र्यांना पाहताच कुटुंबीयांचे अश्रू अनावर झाले. "आरोपींवर मकोका लावा आणि त्यांना फाशीची शिक्षा होईल असे पहा," अशी आर्त साद काळोखे कुटुंबाने घातली. यावर शिंदे यांनी अत्यंत कठोर भूमिका मांडली. "काळोखे कुटुंब हे शिवसेनेचे कुटुंब आहे. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या हत्याकांडातील एकाही आरोपीला सोडले जाणार नाही, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल," असा शब्द एकनाथ शिंदे यांनी पीडित कुटुंबाला दिला.

## संभाजीनगरमध्ये महायुतीत ७ जागांवर पेच कायम : ६ तासांची मॅरेथॉन बैठक ठरली निष्फळ

**छत्रपती संभाजीनगर** : येथे युतीच्या जागावाटपावरून सुरू असलेला पेच कायम आहे. शनिवारी सहा तास चाललेल्या बैठकीतही सात जागांवर एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे आता हा प्रस्ताव महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अंतिम निर्णयासाठी पाठवण्यात आला आहे, अशी माहिती पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

केंद्रीय मंत्री भागवत कराड यांच्या निवासस्थानी महायुतीच्या नेत्यांची बैठक पार पडली. आज सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत ही बैठक चालली. या बैठकीला भाजपकडून खासदार डॉ. भागवत कराड, ओबीसी विकास मंत्री अतुल सावे, आमदार संजय केनेकर, आमदार रोजा चव्हाण, शहराध्यक्ष किशोर शितोळे आणि समीर राजूरकर उपस्थित होते. तर शिवसेनेकडून (शिंदे गट) पालकमंत्री संजय शिरसाट, राजेंद्र जंजाळ आणि किशनचंद तनवाणी उपस्थित होते.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, जागांबाबत दोन्ही पक्षांमध्ये चर्चा सुरू आहे आणि काही जागांवर तडजोड करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांना प्रस्ताव दिले जात आहेत. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.

दरम्यान, यापूर्वी शुक्रवारी रात्री चंद्रशेखर बावनकुळे आणि संजय शिरसाट यांच्यातही बैठक झाली होती, परंतु त्यातही कोणताही तोडगा निघाला नव्हता.

या बैठकीनंतर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, "शिवसेना-भाजप नैसर्गिक युतीमध्येच छत्रपती संभाजीनगर महापालिका लढवण्याचे वरिष्ठांचे आदेश होते. त्या आदेशाच्यादृष्टीने आम्ही तीन-चार बैठका केलेल्या आहेत. आज भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षांच्या संभाव्य वॉर्डांची आणि उमेदवारांच्या याद्या बनवण्यात आल्या आहेत. दोन्ही याद्या वरिष्ठांकडे पाठवल्या जातील. आज संध्याकाळपर्यंत दोन्ही पक्षांच्या वरिष्ठांकडून दोन्ही याद्यांवर मंजुरी देतील आणि त्यानंतर महायुतीची एकत्रित बैठक घेऊन जागावाटप जाहीर केले जाईल."

हायुतीचे जागावाटप अंतिम झाल्यामुळे आता छत्रपती संभाजीनगरच्या राजकीय मैदानात निवडणुकीचा ज्वर अधिकच चढणार आहे. शिवसेनेच्या 'बाण' आणि भाजपच्या 'कमळ' चिन्हावर कोण-कोणते उमेदवार रिंगणात उतरतात, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५

## आ.संजनाताई जाधव यांची जि.प.प्राशा. वासडी शाळेस भेट



**कन्नड (अरुण थोरात):** आमदार आपल्या दारी उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीन वसाहत केंद्र वासडी तालुका कन्नड येथे तालुक्याचे आमदार संजनाताई जाधव यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या सोबत प्रशासकीय अधिकारी तथा कक्ष प्रमुख मुख्यमंत्री शासकीय योजना समन्वय व मदत कक्ष चे अनिल घुगे तसेच खरेदी विक्री संघाचे चेअरमन ज्ञानेश्वर निकम, कन्नड पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी सबाहत नईमुद्दीन मोहम्मद तसेच शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, शिक्षण विस्तार अधिकारी बाजीराव ताठे, नारायण बोडखे, तालुकाप्रमुख, विनोद जाधव, प्रशांत निर्मळ, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जयेश बोरसे यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली. यप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांनी शाळेच्या विकासासंबंधी व अडचणी संबंधी विस्तृत विवेचन आपल्या प्रास्ताविकामध्ये मांडले. त्यातून शाळा स्तरावर करता येणाऱ्या सुधारणांविषयी सखोल मांडणी केली. याप्रसंगी आ. संजनाताई जाधव यांनी शाळेच्या विविध मागण्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेत जिल्हा परिषद शाळेला प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने शाळेच्या अडचणींवर योग्य त्या मार्गाने तोडगा काढून लवकरच शाळेचा कायापालट करणार असल्याचे सांगितले. शेवटी शाळेचा परिसर शाळा खोली इमारती यांची पाहणी केली व लवकरात लवकर शाळेच्या भौतिक सुविधा सुधारण्यासंबंधी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रम प्रसंगी सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामपंचायत खातखेडा, साखरवेल, तसेच शाळा व्यवस्थापन समिती नवीन वसाहत अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती खातखेडा अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य, सर्व शिक्षक वृंद खातखेडा, माता पालक गट, अंगणवाडी सेविका, वैद्यकीय अधिकारी, आशा कार्यकर्ता, शाळा कृती समिती, सर्व ग्रामस्थ व पालक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अतुल बागुल (स. शिक्षक जि. प. प्रा. शा. खतखेडा) यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अपर्णा धाटबळे (मुख्याध्यापिका), किरण सोमदे (स. शिक्षिका), अण्णा बनकर (अध्यक्ष), भैय्यासाहेब घाटगे (उपाध्यक्ष) सह व्यवस्थापन समिती जि प प्रा शा नविनवासहत कें. वासडी ता. कन्नड यांचे सहकार्य केले.

## बहिरगाव शाळेचे कलाशिक्षक सलीम आतार यांची राज्यस्तरीय पोस्टर स्पर्धेसाठी निवड



**कन्नड (प्रतिनिधी):** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , पुणे यांच्या वतीने परभणी येथे आयोजित शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी विभागीय पोस्टर स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव (ता. कन्नड) येथील कलाशिक्षक सलीम अत्तार यांनी दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्यांनी साकारलेल्या 'पर्यावरण संरक्षण' या विषयावरील उत्कृष्ट पोस्टरला विभागात चतुर्थ क्रमांक मिळाला असून, त्यांची आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.विभागीय स्तरावर झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत विभागातील अनेक शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. सलीम अत्तार यांनी आपल्या कल्पकतेतून आणि कुंचल्याच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारे अतिशय बोलके आणि सुंदर पोस्टर सादर केले. त्यांच्या या कलाकृतीने परीक्षकांचे लक्ष वेधून घेत पहिल्या पाच क्रमांकात स्थान मिळवले. या यशामुळे कन्नड तालुक्याच्या आणि जिल्हा परिषद शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप शाळेतील शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, श्याम खोसरे, श्रीमती किरण पाटील, राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी राज्यस्तरीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## तीन दिवसांच्या मूल्यवर्धन प्रशिक्षणातून अनुभवलेले

शिक्षक म्हणून आपण दिवसातून अनेक गोष्टी शिकवतो, पण विद्यार्थ्यांच्या जीवनातील मूल्यांची जाणीव रुजवणे ही खरी जबाबदारी आहे. मूल्यवर्धन प्रशिक्षण 3.0 या तीन दिवशीय प्रशिक्षणात सहभागी होऊन मला हे पुन्हा लक्षात आले. प्रशिक्षणात आम्हाला फक्त शैक्षणिक माहिती सांगितली गेली नाही, तर विविध खेळ, गीत, अभिनय, अनुभव कथन आणि समूह उपक्रमांद्वारे मूल्यशिक्षण कसे प्रभावीपणे करता येईल, हे शिकवले गेले. मला प्रत्यक्ष अनुभवातून समजले की मूल्ये शिकवणे म्हणजे फक्त "चांगले वागा" असे सांगणे नाही, विद्यार्थ्यांना कृतीतून शिकवणे महत्त्वाचे आहे. आतापर्यंत मी काहीशी उपदेशात्मक पद्धती वापरत होतो, पण या प्रशिक्षणामुळे मला समजले की कथा सांगणे, लघुनाट्य, भूमिका सादरीकरण किंवा खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान, सहकार्य, जबाबदारी, शिस्त, संवेदनशीलता आणि निर्णयक्षमता यांसारखी मूल्ये अधिक प्रभावीपणे रुजवता येतात. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो आणि वर्गातील वातावरण उत्साही बनते.मला हेही जाणवले की मूल्यवर्धन वर्ग हा स्वतंत्र तास न राहता दैनंदिन अध्यापनाचा अविभाज्य भाग बनवता येतो. आपण शिकवताना थोडे प्रयोग, साधे उपक्रम किंवा काही अनुभव विद्यार्थ्यांसोबत शेअर केले की ते मूल्य स्वतः आत्मसात करतात. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी जास्त आनंददायी आणि शिक्षकांसाठी प्रभावी ठरते.शिक्षक म्हणून माझ्या दृष्टीकोनात आता बदल झाला आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या विचारसरणीवर, वर्तनावर आणि मूल्याधारित निर्णयांवर लक्ष देणे अधिक महत्त्वाचे आहे. माझ्या शब्दांचा, कृतींचा आणि मार्गदर्शनाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या जीवनावर कितपत होतो, हे जाणून घेणे माझ्यासाठी खूप उपयोगी ठरले. एकूणच मूल्यवर्धन प्रशिक्षण 3.0 हे माझ्यासाठी प्रेरणादायी, अनुभवप्रधान आणि शिक्षक सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरले. आता मी माझ्या वर्गात विद्यार्थ्यांना फक्त ज्ञान देण्याऐवजी मूल्य, संस्कार आणि सामाजिक जाणिवाही अधिक प्रभावीपणे शिकवण्याचा प्रयत्न करणार आहे. शिक्षक म्हणून हीच खरी समाधानाची बाब आहे.

**विठ्ठल अनमुलवाड**
पूर्णा,परभणी

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५


## बिबट-मानव संघर्षावर आधारीत लघु नाटिकेचे सादरीकरण




**कन्नड (अरुण थोरात):** ज्ञानदीप विद्यालय सिल्लोड येथे "कुणी घर देता घर" या नाटीकेतून बिबट्याची पिंजरा घेवून भटकंती चे सादरीकरण करण्यात आले. सध्या राज्यभर बिबटया ने धुमाकूळ घातला असून बिबट्या व मानव हा संघर्ष शिगेला पोचला आहे. अधिवास हरवलेल्या बिबटयाने वनमंत्री यांना माणसालाच पिंजरा लावण्याची मागणी चा विषय गाजत आहे. अभिनव प्रतिष्ठान चे उपाध्यक्ष व शासनाच्या "मानव - वन्यजीव संघर्ष" समितीचे सदस्य असलेले डॉ. संतोष पाटील यांनी वनजागर या उपक्रमाद्वारे याबाबत सातत्याने जनजागृती करीत आहेत. या विषयावर त्यांनी लिहिलेल्या "कुणी घर देता का घर " या लघु नाटिकेचे शहरातील ज्ञानदीप माध्यमिक व प्राथमिक विद्यालयात सादरीकरण करण्यात आले. शाळेतील 05 मुलं व स्वतः डॉ. पाटील यांनी हे प्रभावी सादरीकरण केलं.

नाटीकेतील प्रबोधनाचे मुद्दे:- कुणी घर देता का घर" ही साद घालत अधिवास हरवलेला, हातात पिंजरा घेत जंगलाकडे घुसणाऱ्या माणसालाच कोंडण्याच्या तयारीत असणारा बिबटया सर्वांनाच भावला. बिबटया पासुन कसे संरक्षण करावे. यावर ही प्रबोधन करण्यात आले. यासाठी संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव गवळी, शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिकचे मु. अ. सतिष बडक, सह शिक्षक काकासाहेब वाढेकर, अस्लम तडवी, गोकुळ सिनकर, संगीता बोर्डे , गणेश व्यवहारे, विश्वनाथ लुटे, अर्चना देशपांडे, संगीता वाकडे, संगीता बोर्डे, विजय चापे, सुनील दुसाने ई. परिश्रम घेतले.

## शिवाजी महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क कार्यशाळा संपन्न




**कन्नड :** शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे दिनांक *२६ डिसेंबर २०२५* रोजी बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Rights – IPR) या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व, प्रकार व नोंदणी प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी *संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा* येथील *प्राध्यापक नितीन भोगे* हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी बौद्धिक संपदा हक्कांची संकल्पना स्पष्ट करताना पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, डिझाइन तसेच भौगोलिक चिन्ह (GI) या प्रमुख प्रकारांची माहिती दिली. नवीन शोध व तंत्रज्ञानासाठी पेटंट, साहित्यिक व कलात्मक निर्मितीसाठी कॉपीराइट, उत्पादने व सेवांसाठी ट्रेडमार्क, उत्पादनाच्या बाह्य रचनेसाठी डिझाईन आणि विशिष्ट भौगोलिक उत्पत्तीशी संबंधित उत्पादनांसाठी GI यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.बौद्धिक संपदा हक्कांमुळे नवीन कल्पना व नवसर्जनाला चालना मिळते, निर्मात्यांना त्यांच्या कार्याचा आर्थिक लाभ मिळतो तसेच सामाजिक, वैज्ञानिक व आर्थिक विकासाला हातभार लागतो, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी *प्रा. डॉ. एस. एम. पवार* होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी दैनंदिन जीवनात काढलेले छायाचित्रे, तयार केलेली डिझाईन्स किंवा इतर सर्जनशील कल्पनांमध्ये नाविन्य निर्माण केल्यास त्यावर कशाप्रकारे हक्क नोंदवता येतात, याबाबत मार्गदर्शन केले.ही कार्यशाळा महाविद्यालयाचे *प्राचार्य डॉ. विजय भोसले* व *उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर* यांच्या मार्गदर्शनाखाली *रसायनशास्त्र विभागातर्फे* आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक *प्रा. डॉ. बी. के. मगरे* यांनी केले, सूत्रसंचालन *प्रा. डॉ. अतिश मेहेत्रे* यांनी केले, तर आभार प्रदर्शन *प्रा. डॉ. डी. टी. साखरे* यांनी केले.

## ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे आज अपंग बोर्ड व शत्रक्रिया शिबीर सम्पन्न




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** अपंग बोर्ड चं आयोजन आणि बिन टाक्याचे (Laproscopy) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते या शिबीरामध्ये एकूण अपंग रुग्णाची तपासणी करण्यात आली तर 25 महिलांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्यात गरजु लाभार्थ्यांनी या शिबारचा लाभ घेतल्या बद्दल नूतन वैद्यकीय अधीक्षक डॉ संजय मस्के यांनी समाधान व्यक्त केलेदिव्यांग शिबीर,,h... महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरुवारी आहे.

दिनांक 24.12.2025 रोजी एकूण 23 जणांची तपासणी करण्यात आली १९.. पुरुष ०४.. महिला यशवास्वी करण्या साठी डॉ. रुपेश धमगुंडे अस्ती रोग तज्ञ जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथून आले. त्यांना डॉ. मस्के संजय (जोगवाडकर) वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय जिंतूर, डॉ. पारवे वैद्यकीय अधिकारी, श्रीमती पाटोळे सहायक अधीक्षक, श्री. कुलकर्णी कनिष्ठ लिपीक, श्री. गजानन वाळे कक्ष सेवक, श्री. मयूर डाटा एन्ट्री ऑपरेटर व स्टाफ यांनी सहकार्य केले..


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५


## श्री संचारेश्वर विद्यालयात विर बाल दिवस उत्साहात साजरा




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** २६ डिसेंबर २०२५ रोजी श्री संचारेश्वर विद्यालयात वीर बालदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून शिवाजी सोमोसे तर प्रमुख पाहुणे म्हणून दिलीप खिल्लारे तसेच मुख्य वक्ते म्हणून बाळासाहेब ठोंबरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता प्रतिमापूजन करुन करण्यात आली. बाळासाहेब ठोंबरे यांनी विर बाल दिवस का साजरा करतात ते सांगितले. वयाच्या अवघ्या ७ आणि ९ व्या वर्षी या मुलांनी ज्या धैर्याने मुघल सत्तेचा सामना केला, त्याला तोड नाही. याच महान बलिदानाचा सन्मान म्हणून आज २६ डिसेंबर देशभर वीर बाल दिवस साजरा केला जातो. विर बालकांच्या कथा याप्रसंगी बाळासाहेब ठोंबरे यांनी सांगीतल्या. तसेच संस्कार केंद्रात या वीर बालदिवस निमित्त चित्रकला, रंगभरण, निंबंध, कथाकथन अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात शिवाजी सोमोसे यांनी विर बापू गायधनी यांची कथा सांगितली.व विद्यार्थ्यांनी धाडसी असले पाहिजे असे प्रतिपादन केले. या वर्षी २० मुलांना हा पुरस्कार त्यांच्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य तसेच धाडसी कृत्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जाणार आहे.श्री संचारेश्वर विद्यालय जिंतूर तर्फे या सर्व मुलांचे कौतुक व अभिनंदन माननीय अध्यक्ष महालिंगआप्पा कुरे , कार्यवाह रविकुमार पेशकार व मुख्याध्यापक दमन देगावकर यांच्या तर्फे करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली सोनसळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक शांती मंत्राने करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किरण नाईक, संजय गायकवाड, बाळासाहेब ठोंबरे,कृष्णा मुसळे,विवेक मुक्कावार, प्रल्हाद वैरागर, गंगाधर पांचाळ,उषा खराबे, रूपाली सोनसळे,वर्षा गणगे, दिपाली देशपांडे, मनिषा धाबेवार, अंजली जावळे यांचे सहकार्य लाभले.

## प्रगतिशील साहित्य संमेलनात बापू वऱ्हाडेंच्या कथेची अव्वल पाचमध्ये निवड




**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद महाविद्यालय आणि प्रगतशील लेखक संघ यांच्या वतीने आयोजित प्रगतिशील साहित्य संमेलन,छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने कथालेखन व काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ६०-७० कवी व ५० कथालेखक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या ५० कथांपैकी पाच कथांची निवड करण्यात आली. यामध्ये बापू वऱ्हाडे यांच्या 'अवकाळी स्वप्नांची केवायसी' या कथेची पहिल्या ५ कथांमध्ये निवड झाली. त्यावेळी मंचावर उपस्थित मान्यवर प्रगतिशिल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार उत्तम बावस्कर, उद्घाटक प्रसिद्ध कवी, गीतकार प्रशांत मोरे, प्रमुख अतिथी प्रसिद्ध कादंबरीकार राकेश वानखेडे, स्वागताध्यक्ष विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव मा.श्रीमंतराव शिसोदे, लेखक, विचारवंत प्रा.जयदेव डोळे, डॉ.किशोर शिरसाट, पत्रकार दत्ता कानवटे, रोशनी शिंपी, अनिकेत म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन बापू वऱ्हाडे यांचा सत्कार करण्यात आला.

## जि प केसरजवळगा येथे आदप्पा गायकवाड यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक साहित्य वाटप



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा या शाळेत कालकथीत आदप्पा गायकवाड हे मातीला सोनं करणारे, स्वप्नांना दिशा देणारे, स्वतःपेक्षा मोठं जगणारे आणि समाज घडवणारे व्यक्तिमत्त्व होते. अशी माणसं कधीच जात नाहीत; ती फक्त रूप बदलून इतिहासाच्या पानांवर अमर होऊन राहतात, असे भावपूर्ण उद्गार यावेळी उपस्थितांनी काढले.त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून शिक्षणाविषयीची त्यांची दूरदृष्टी आणि समाजाप्रतीची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली.या कार्यक्रमास संजीवकुमार गायकवाड, डॉ. श्रेयस गायकवाड, श्रुती गायकवाड, विजयकुमार गायकवाड यांच्यासह गुंडाजी कांबळे, दत्तू गायकवाड (माजी सरपंच), अमोल पटवारी, जयंपालसिंग राजपूत (उपसरपंच), संदीप पाटील (अध्यक्ष शा. व्य.), अजीज शेख (उपाध्यक्ष), केंद्रप्रमुख संतोष बोडरे, शिरीष पाटील, पंडित जळकोटे, दिव्यांग संघटना अध्यक्ष विशाल गायकवाड, विजय गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र मु अ बालाजी भोसले, सहशिक्षक संजीव भोसले, सुनिल राठोड, सुंकेवार सर, कुन्हाळे सर , अनंत वाघमोडे, साधना ताशी आदींनी परिश्रम घेतला या कार्यक्रमाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत आदप्पा गायकवाड यांच्या समाजोपयोगी कार्याची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करून अशाच उपक्रमांतून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला. सुत्रसंचलन मु अ बालाजी भोसले यांनी तर आभार सुनिल राठोड यांनी मानले..




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५


# 'कवितेसाठी जगणाऱ्या कवींची अनौपचारीक काव्य मैफल बहरली'






**छत्रपती संभाजीनगर :** 'ध्यास गझल साहित्य समूह' आयोजित 'टेरेसवरील कवितांची' मैफल सातारा परिसर येथे कवी हनुमंत सोनवणे ह्यांचे घरी चांगलीच रंगली.चिरंजीव श्रेयस सोनवणे ह्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित ही शब्दस्नेहींची अनौपचारिक काव्य मैफल उत्तरोत्तर चांगल्या उंचीवर गेली.कवी गिरीश जोशी ह्यांच्या संकल्पनेवर आधारित ह्या मैफलीत एकापेक्षा एक आशयघन,रसाळ कवितांचे चांदणे रसिकांना वेचायला मिळाले.विविध विषयांना हात घालणाऱ्या कविता,गझला,अभंग,कवींनी सादर करून श्रोत्यांना काव्यसंतुष्ट केले.मैफलीची सुरुवात प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली.माजी विभागीय आयुक्त डॉ पुरुषोत्तम भापकर ह्यांनी अतिथीपद भूषविले,कार्यक्रमाचे अध्यक्ष पद श्री महेश खरात ह्यांनी भूषविले,संतोष देशमुख,चंद्रकांत पांडे, दत्तात्रय मोरे,नारायण पुरी ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कवी रमेश ठोंबरे ह्यांनी,'फळे, सावली, श्वास दिला अन कुऱ्हाडीसही दांडा भविष्यातले का झाडाला दिसले नाही काही! ' ही गझल सादर केली.मृणाल देशपांडे ह्यांनी,'रुतलेल्या पाय वाटेवरून शोधावी स्वतःची सावली स्वतःच लावलेल्या झाडांची,कदाचित त्यासाठी लगाणारीमाती व्हावं आपण,कदाचित त्यात रुजणारंबीज व्हावं आपण' ही कविता सादर केलीयुवा कवी अजय त्रिभुवन ह्याने,'बोलतो ते करून दाखवतो हारतो पण लढून दाखवतो वाटतो जो अशक्य दुनियेला तोच डोंगर चढून दाखवतो' गझल सादर केली.'याहून मोठी कुठली पदवी जगात आहे,लेक सारखी आई आई म्हणते आहे' ही गझल रेणुका जोशी ह्यांनी सादर केली.'गोऱ्या पोरीच्या नाशिबीहीकाळपट नवरे आलेजोड्या विजोड होत्यापण घटस्फोट नाही झाले.'कवी प्रा.विजय पोहनेरकर ह्यांनी ही विनोदी कविता सादर करून वातावरण हलकेफुलके केले.गझलकार गिरीश जोशी ह्यांनी 'भांडून घेतले ना मागून घेतलेजे चार घास उरले वाटून घेतले,व्हीआयपीच दिसले देवासभोवतीदर्शन म्हणून आम्ही लांबून घेतले,आला कुणी न माळी रक्षण करावयामग शेवटी फुलांनी जाळून घेतले...'ही गझल सादर करून वातावरणात गझलेचे रंग भरले.दिलीप सोनवणे ह्यांनी,'नकोत केवळ प्रेमळ माता नकोत केवळ आई ,बाळ शिवबाला घडविण्याआज हवी एक जिजाई' ही कविता सादर केली.डॉ सुशील सातपुते ह्यांनी ही कविता सादर केली.'भविष्यात होणाऱ्या राजकीय चित्रपटांना माझ्या हार्दिक शुभेच्छा !नोटाचा रंग बदलता बदलता माझ्या तिरंग्याचा रंग बदलू नये एवढीच माझी इच्छा !'युवा कवी ऋषभ कुलकर्णी ह्याने,'कुठे गेली ती माणसे नातीगोती जपणारी.. "चालीरीती पाळणारी..सुख दुःख वाटणारी'..,ही कविता सादर केली.संध्या अचिंतलवार ह्यांनी,बरे वाटते का वाघिणीस पोटचे बाळ खाताना पण वात्सल्य होरपळते भुकेचा जाळ झाल्यावर..ही कविता सादर केली.सुहास महाजन ह्यांनी,हमारा कौन है ?वाह वाह तुम्हारी हैतालिया तुम्हारी हैचेहरे पर मुस्कान तुम्हारी हैऔर तो औरजादू की झप्पी तुम्हारी हैफिर यहांहमारा कौन है ?ही हिंदी रचना सादर केली.प्रशांत नानकर ह्यांनी,'ते दिन आगळे होते, जगण्यातही बात होती..दाखल्यास फक्त ठाऊक, मित्रांची जात होती'ही रचना सादर केली.हनुमंत सोनवणे ह्यांनी'नुसते बघण्यासाठी मजला किती जवळून गेलीस तू,"अन जरासा स्पर्श झाला किती लाजून गेलीस तूही कविता सादर केली'.पंडित वराडे ह्यांनी,'गतवर्षाला निरोप देतानववर्षामध्ये पाऊल पडतापप्रसन्नतेने सदाफुलीसम फुलत रहा, तू खुलत रहा सुखासावे तू झुलात रहा' ही कविता सादर केली.सुनिता कपाळे ह्यांनी,जाते उडुनी पाखरे माय बापाचे घरटे सुनं सुनं होतं घर कंठ काळजाचा दाट' ही कविता सादर केली.दीपक नागरे ह्यांनी,दिवाळीचा सण येता बहीण माहेरी येते मुक्या घरट्यात भावाच्या सुख पेरूनिया जाते' ही कविता सादर केली.कवी रोहिदास शिखरे ह्यांनी,'लेकी तुझ्या विना दारगेल्यापासून गप्प गार भिंती सुद्धा बोलत नाही लेकी सांत्वन त्याचे करून जा लेकी दोन दिवस येऊन जा माहेराला राहून जा'. यासोबतच सुनील उबाळे ,रश्मी देशपांडे,रुपाली पाटील,अरविंद कुलकर्णी,मनोज अग्रवाल,माधव कुलकर्णी,ॲड. कैलास कोळपकर,विजयकुमार पांचाळ,मनोज अग्रवाल इत्यादी कवींनी बहादार कविता सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली.माजी विभागीय आयुक्त डॉ.पुरुषोत्तम भापकर ह्यांच्या कवितेने मैफलीची सांगता झाली.महेश अचिंतलवार ह्यांनी बहारदार सूत्रसंचालन करून मैफलीत जीव ओतला.यासोबतच दर्दी काव्य रसिक मैफलीसाठी उपस्थित होते.ह्या मैफलीच्या यशस्वीतेसाठी कवी गिरीश जोशी,हनुमंत सोनवणे ह्यांनी परिश्रम घेतले.

## ठाकरवाडी जिल्हा परिषद शाळेची शौचालय अनेक वर्षापासून बंद निरगुडी बु. ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : शाळा म्हणजे विद्येचे मंदिर सध्याच्या काळात सर्व शाळांचे आधुनिकीकरण होत आहे खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांना सर्व आधुनिक सुविधा मिळत आहे शाळेतील विद्यार्थ्यांना विविध योजना सुख सुविधांच्या सरकार घोषणा करत असतं परंतु खरंच सरकारच्या योजना जिल्हा परिषद शाळा पर्यंत पोहोचतात का? असा प्रश्न उपस्थित झालाय कारण खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी केंद्र गल्लेबोरगाव ता खुलताबाद जि छत्रपती संभाजीनगर या शाळेमध्ये विद्यार्थी संख्या अंदाजे 132 इतकी आहे या शाळेत शौचालयाची परिस्थिती चांगली नाही या शौचालयात उभे राहण्यासाठी जागा नाही भांडे नाही लघवी व संडास साठी विल्हेवाट साठी सुविधा उपलब्ध नाही.यासाठी ग्रामपंचायतकडे निधी उपलब्ध/मंजूर असूनही या शौचालयाची दुरावस्था झाली आहे शाळेतील शौचालय अनेक वर्षापासून बंद असून पूर्णपणे निकामी आहे परिणामी विद्यार्थ्यांना शौचालयासाठी सरांची/ मॅडमची परवानगी घेऊन जोरात मोटरसायकल धावणाऱ्या रस्त्याला ओलांडून गुडघेपेक्षा जास्त उंच गवतात शौचालयासाठी जावं लागतं जर एखाद्या विद्यार्थ्याला विद्यार्थिनीला या गवतामध्ये सर्प दंश किंवा अपघात झाला तर त्याला जबाबदार शाळेतील शिक्षक कि शालेय समिती किंवा ग्रामपंचायत असा सवाल पालकांना गावकऱ्यांना उपस्थित झाला आहे.या शौचालयाच्या भोवतीने डोक्या इतकी उंच भिंत त्यावर तार कंपाऊंड बांधून एकच मुख्य दरवाजा ठेवावा तरच हे शौचालय कायमस्वरूपी चांगले राहील असे पालकांनी मत व्यक्त केले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५

## फतीयाबाद येथे अवैध गौण खनिज वाहतूक करणारा हायवा महसूल विभागाला हुलकवणी देऊन फरार झाला



**खुलताबाद : (जावेद अहेमद) :** आसेगाव (ता. गंगापूर) परिसरात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारा हायवा वाहन चालक व वाहन मालक पथकाच्या कारवाईतून महसूलविभागाच्या पथकाला हुलकवणी देऊन फरार झाल्याची घटना मंगळवारी (दि. 25) रात्री घडली.तहसील कार्यालय गंगापूर अंतर्गत अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी तहसीलदार नवनाथ वाघवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाचे पथक रात्री नाईट पेट्रोलिंग करत होते. यावेळी आसेगाव गट नंबर 104, गोकुळवाडी रोड, फत्तियाबाद येथे नंबर प्लेट नसलेला हायवा माती मिश्रित वाळूची बेकायदेशीर वाहतूक करत असल्याचे आढळून आले.पथकाने सदर हायवा थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर स्कॉर्पिओ वाहन (क्र. MH-२०-GM-८६८६) मधून आलेल्या अनिस शेख या इसमाने हायवा आपला असल्याचे सांगितले. मात्र तहसीलदारांनी हायवा रस्त्याच्या कडेला घेण्यास सांगताच हायवा चालकाने वाहन घटनास्थळावरून पळवून नेले. तसेच स्कॉर्पिओ वाहन चालकानेही घटनास्थळावरून पलायन केले.यानंतर महसूल पथकाने परिसरात शोध घेतला असता दोन्ही वाहने आढळून आली नाहीत. सदर प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी दिपाली आशोकराव गुल्हाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये अवैध गौण खनिज चोरी व वाहतुकीबाबत संबंधितांविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे

## मनपा केंद्रीय प्रा. व मा. शाळा, मुकुंदवाडी येथे NMMS परीक्षा २०२५-२६ संदर्भात बैठक



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, मुकुंदवाडी येथे राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) सन २०२५—२६ साठी परीक्षा केंद्र असल्याच्या अनुषंगाने सविस्तर बैठक घेण्यात आली.या बैठकीत परीक्षेच्या आयोजनाबाबत सर्व शिक्षकांना आवश्यक त्या सविस्तर सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. परीक्षेचे नियोजन, जबाबदाऱ्या तसेच नियमावली याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवर पाहुण्यांनी शाळेस भेट दिली. त्यांनी शाळेतील वर्गखोल्या, संगणक कक्ष तसेच संगणक लायब्ररीची पाहणी केली. शाळेतील शैक्षणिक सुविधा, स्वच्छता व व्यवस्थापन पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले व शाळेच्या कार्याचे कौतुक केले.या बैठकीसाठी श्री. जयेश चौरे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, श्री. कमलाकर पारधी सर, केंद्र संचालक, श्री. नरेंद्र दौंड सर, सहकेंद्र संचालक, तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. चौधरी सर आणि संपूर्ण शिक्षकवृंद उपस्थित होते.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

## विनापरवानगी कुठल्याही कार्यक्रमाला अथवा बैठकीला, फार्महाऊस भाड्याने द्याल तर तुमच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल : पोलीस निरीक्षक रेखा लोंढे





**खुलताबाद : (जावेद अहेमद) :** विनापरवानगी कुठल्याही कार्यक्रमाला अथवा बैठकीला, फार्महाऊस भाड्याने द्याल तर तुमच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल"पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी फार्महाऊस धारकांच्या बैठकीत सूचना दिली. अब्दीमंडी व दौलताबाद परिसरातील फॉर्म हाऊस धारक,रिसॉर्ट, हॉटेल चालकांची शनिवारी दि 27 रोजी दौलताबाद पोलिस ठाण्यात बैठक घेण्यात आली.परिसरातील फार्म हाऊस मध्ये सध्या कुठलेही बंधन न बाळगता सरास भाड्याने दिले जात आहेत, यात भाड्याने घेणाऱ्याची कुठलीही नोद हें फार्महाऊस धारक ठेवत नही यामुळे अवैध धंदे या परिसरात जोमाने सुरु आहे. वारंवार सूचना देऊनही हें फार्महाऊस धारक मनमानी करत आहेत.कायदेशीर परवानग्या घेऊनच फार्म हाऊस चालवा अन्यथा फार्म हाऊस सील करण्यात येईल" असे निरीक्षक रेखा लोंढे यांनी सर्व हॉटेल चालक,फॉर्म हाऊस धारक यांची बैठक घेऊन सांगितले.अब्दीमंडी, दौलताबाद परिसरात 76 फॉर्म हाऊस व हॉटेल, रिसॉर्ट आहेत. पोलीस प्रशासनाच्या वतीने सर्व फार्म हाऊस व हॉटेल धारकांना हॉटेल फार्म हाऊस वर असलेल्या रूम्स भाड्याने देताना येणाऱ्या ग्राहकाचे सर्व तपशील जतन करायला बंधन कारक असल्याचे यावेळी सांगितले. एवढ्या मोठ्या प्रमाणात असलेल्या काही फार्म हाऊस वर गुन्हेगारी कृत्य व अवैध व्यवसाय होऊ शकतो. तपशील जतन केला तर पोलिसांना सुद्धा गुन्हेगारी कृत्यांना आळा घालता येऊ शकतो. नियमाचे पालन न केल्यासभारतीय नागरीक स्रक्षा संहीता कलम -168 प्रमाणे गुन्हा दाखल होऊ शकतो.फॉर्म हाऊसवर रिसॉर्ट, धांमिक कायंक्रम तसेच इतर लग्न समारंभ, वाढदिवस, विनापरवाना आयोंजण करण्यात येतात.तसेच सदर पाट्यांचे आयोजना दरम्याण कुठलही परवानगी न घेता मोठ स्पिकर लावुन गाणे वाजवणे,हुक्का पालर व पत्ते खेळणे,दारु पिण्यास जागा उपलब्ध करू देणे असे प्रकार सुरु असल्याचे पोलिसांना प्रथमदर्शी निदर्शनास आलेले आहे. असे नीदर्शनास आले असुन सदरचे कृत्य बेकायदेशीर आहेव सदरची बाब अत्यंत गंभीर आहे कुठल्याही प्रकारचे स्पिकर वाजवण्याकरिता पोलिसांची ध्वनी प्रदषन परवानगी बाळगणे आवश्यक आहे. तसच बंधनकारक आह व इतर कोणत्याही प्रकारचा धार्मिक कायक्रम .लग्न समारंभ अथव पाट्यांचे आयोजन विनापरवाना करणार नाहीत याची दक्षता घ्यावी. जर आपल्या फार्महाऊसवर कढल्याह प्रकारचा कार्यक्रम.लग्न समारंभ विनापरवाना आयोजन झाल्यास फार्महाऊस परिसरात कृठल्याह प्रकारचा कायदा' ब सुव्यवस्थचा प्रश्न नमाण झाला'व त्याची सुरुवात आपल्या फार्मंहाऊसवरुन झाल्यावर आपणही त्यात सामील आहात असे सिध्द हॉाईल व त्याचे परिणाम म्हणुन आपणा विरुध्द प्रचलित कायद्यानुसा कारवाडई करण्यात यईल' तसेच आपण आपल्या ' फार्महाऊसचे सर्व कायदेशिर बाबीची पूर्तता करुन आपल्याफार्महाऊसचा वापर करावा आपण आपल्या फार्महाऊसवर कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रमाची परवानगी देवु नय फामहाऊस चा वापर कवळ वयक्तीक वापरासाठी करावा वरील सुचंनांचे आपण तंतोतंत पालन कराव आपण कुठल्याही कायक्रमास परवानगी दिल्यास सदरची नोटीस आपल्यावरुध पुरावा म्हणुन वापरण्यात यईल याची आपण नोंद घ्यावी

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५

# नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’चे समाजशास्त्रीय महत्त्व

मानवी समाजरचनेचा केंद्रबिंदू म्हणजे नातेसंबंध होय. माणूस जन्माला येतो तो केवळ जैविक अस्तित्व म्हणून नव्हे, तर सामाजिक अस्तित्व म्हणून. कुटुंब, नातेवाईक, समाज, संस्था आणि विविध सामाजिक गट यांच्याशी असलेल्या परस्परसंबंधांतूनच त्याची ओळख, मूल्यव्यवस्था आणि जीवनदृष्टी घडत असते. या सर्व नात्यांमध्ये मैत्रीचे स्थान अत्यंत वेगळे आणि अर्थपूर्ण आहे. मैत्री ही कोणत्याही औपचारिक बंधनांवर आधारलेली नसून स्वेच्छेने, समतेच्या आणि विश्वासाच्या पायावर उभी राहिलेली नाती असतात. २८ डिसेंबर रोजी साजरा होणारा ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या मैत्रीच्या नात्यांचे स्मरण करून देतो आणि आधुनिक समाजातील संवादाच्या तुटवड्यावर समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची संधी देतो.समाजशास्त्र माणसाला ‘सामाजिक प्राणी’ मानते. व्यक्तीचे विचार, भावना, वर्तन आणि जीवनशैली ही समाजातील सततच्या संवादातूनच घडत असते. या प्रक्रियेत मित्रांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरते. मित्र हा असा सामाजिक आधार असतो की ज्याच्यासमोर व्यक्ती कोणताही मुखवटा न घालता स्वत:ला व्यक्त करू शकते. कुटुंबातील किंवा औपचारिक सामाजिक चौकटीतील मर्यादांपलीकडे जाऊन मित्राशी संवाद साधता येतो. त्यामुळे मैत्री ही व्यक्तीच्या भावनिक सुरक्षिततेसाठी आणि मानसिक आरोग्यासाठी एक महत्त्वाची सामाजिक संस्था ठरते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या संस्थेचे महत्त्व समाजाला पुन्हा जाणवून देतो.आधुनिक काळात मानवी जीवन अधिक गतिमान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण झाले आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे माणूस अधिकाधिक व्यस्त आणि एकाकी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने संवादाची साधने प्रचंड वाढवली असली, तरी संवादाची खोली कमी होत असल्याचे समाजशास्त्रीय अभ्यासातून दिसून येते. सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप संदेश किंवा इमोजी यांच्या माध्यमातून संपर्क राहतो; पण मन मोकळे करून बोलण्याची सवय कमी होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मित्राला फोन करून प्रत्यक्ष संवाद साधणे ही कृती केवळ तांत्रिक नसून सामाजिक आणि भावनिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या डिजिटल दुराव्याला छेद देणारा मानवी संदेश देतो.समाजशास्त्रातील ‘सामाजिक भांडवल’ ही संकल्पना नातेसंबंधांचे सामर्थ्य स्पष्ट करते. विश्वास, परस्पर सहकार्य, संवाद आणि सामाजिक नेटवर्क्स यांचा एकत्रित परिणाम म्हणजे सामाजिक भांडवल. मित्रपरिवार हा या सामाजिक भांडवलाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. अडचणीच्या काळात मित्र मदतीला येतात, भावनिक आधार देतात आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतात. अनेक वेळा मित्राशी केलेला संवाद हा उपचारासारखा ठरतो. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या सामाजिक भांडवलाचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.मानसिक आरोग्याच्या संदर्भात या दिवसाचे महत्त्व अधिक ठळकपणे जाणवते. आजच्या समाजात तणाव, नैराश्य, चिंता, असुरक्षितता आणि एकटेपणा या समस्या झपाट्याने वाढत आहेत. समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय अभ्यासानुसार सामाजिक अलगाव हा मानसिक आजारांचा एक प्रमुख कारणीभूत घटक आहे. विशेषतः विद्यार्थी, स्थलांतरित कामगार, शहरी नोकरदार वर्ग आणि वृद्ध यांना या समस्यांचा अधिक सामना करावा लागतो. अशा वेळी मित्राचा साधा फोन कॉलही एखाद्या व्यक्तीसाठी आधारवड ठरू शकतो. ‘कोणी तरी आपल्याशी संवाद साधते आहे’ ही भावना माणसाला मानसिक बळ देते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस समाजाला या संवेदनशील वास्तवाची जाणीव करून देतो.भारतीय समाजात मैत्रीची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ग्रामीण समाजात शेजारी, सहकारी, बालसवंगडी यांच्यातून मैत्री विकसित होत असे. सामूहिक जीवनपद्धतीमुळे संवाद, सहवास आणि परस्परावलंबन अधिक होते. मात्र आधुनिक काळात विभक्त कुटुंब पद्धती, स्थलांतर, शिक्षण आणि नोकरीच्या संधींमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. अनेकदा बालपणीचे किंवा तरुणपणीचे मित्र काळाच्या ओघात संपर्काबाहेर जातात. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या विस्मरणात गेलेल्या नात्यांना पुन्हा उजाळा देण्याची संधी देतो.पिढ्यान्‌पिढ्यांतील नातेसंबंधांच्या संदर्भातही या दिवसाचे महत्त्व आहे. जुने मित्र म्हणजे केवळ व्यक्ती नव्हे, तर आपल्या जीवनातील आठवणी, अनुभव आणि सामाजिक इतिहास असतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशी नाती जपणे म्हणजे सामाजिक स्मृती जपणे होय. मित्राला केलेला फोन हा भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा सेतू ठरतो. त्यामुळे ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस सामाजिक सलगतेचे प्रतीक ठरतो.स्त्री-पुरुष मैत्री, आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीतील मैत्री समाजातील समता, सहिष्णुता आणि सलोखा वाढवण्यास मदत करतात. समाजशास्त्र मानते की वैयक्तिक पातळीवरील संवाद आणि मैत्रीमुळे सामाजिक भिंती, पूर्वग्रह आणि भेदभाव कमी होऊ शकतात. एका साध्या संवादातून परस्पर समज वाढते आणि सामाजिक ऐक्य मजबूत होते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या व्यापक सामाजिक ऐक्याचा विचार करण्यास प्रवृत्त करतो.कामाच्या ठिकाणी असलेली मैत्रीही समाजशास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. सहकाऱ्यांमधील मैत्रीमुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते, तणाव कमी होतो आणि परस्पर सहकार्य वाढते. अनेक संशोधनांतून असे स्पष्ट झाले आहे की ज्या संस्थांमध्ये मानवी संबंध सुदृढ असतात, त्या संस्था अधिक स्थिर आणि कार्यक्षम ठरतात. त्यामुळे हा दिवस वैयक्तिक आयुष्यापुरता मर्यादित न राहता सामाजिक आणि व्यावसायिक जीवनातील संवादाचे महत्त्व अधोरेखित करतो.वृद्धांच्या आयुष्यात संवाद आणि मैत्रीचे स्थान अधिक संवेदनशील आहे. विभक्त कुटुंब पद्धती, शहरी जीवनशैली आणि स्थलांतरामुळे अनेक वृद्ध एकटे पडलेले दिसतात. त्यांच्या आयुष्यात मित्राचा फोन कॉल हा आनंद, आठवणी आणि आपुलकीचा स्रोत ठरतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, वृद्धांचे सामाजिक एकाकीपण कमी करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या जबाबदारीची जाणीव करून देतो.एकूणच, ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता, मानवी नातेसंबंधांचे पुनर्मूल्यांकन करण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, मजबूत समाजाची उभारणी ही संवाद, विश्वास आणि आपुलकीवर आधारलेली असते. जेव्हा माणसे एकमेकांशी संवाद साधतात, तेव्हा समाज अधिक संवेदनशील, समतोल आणि मानवी बनतो. म्हणूनच २८ डिसेंबर हा दिवस आपण केवळ मित्राला फोन करण्याचा दिवस न मानता, नात्यांना पुन्हा जिवंत करण्याचा, संवाद वाढवण्याचा आणि समाज अधिक मानवी बनवण्याचा संकल्प म्हणून स्वीकारायला हवा. एका साध्या फोनकॉलमधूनही नाती घट्ट होऊ शकतात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. हीच ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ची खरी समाजशास्त्रीय जाणीव आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५

# नामदेव महाजन लिखीत 'उष्टा काला' प्रेरक अशा कुलाची कथा

कृषिपुत्र नामदेव महाजन हे चाळीसगांव तालुक्यातील वाडागुढे येथील 75 वर्षाचे प्रतिष्ठित शेतकरी. शिक्षण केवळ चौथी शिकलेले. 20 वर्षापर्वी एक तळमळ हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला. उसतोडी कामगारांचे , शेतमजूरांचं दु:ख काय असते एखादे कुटूंब गरीबीच्या गर्गेतूनकष्टाने, सचोटीने, प्रामाणिकपणाने कसे बाहेर पडते याची ही त्या कुटूंबाची सत्यकथा. जानेवारीत हा ग्रंथ लवकरच प्रकाशित होत आहे.'उष्टा काला' हे कृषिपुत्र नामदेव महाजन यांच्या कुलाचा सारा इतिहास मांडणारे आत्मरित्रात्मक कथानक. हे कथानक एका कुटूंबाचे नसून सा-या गावाचे आहे. गाव म्हटला की सा-या जाती जमाती आल्यातच. नामदेव महाजन यांनी केवळ त्यांच्याच कुलाच्या वंशवेलीचा विस्तार मांडलेला नाही तर गावातील इतर जाती जमातींचाही मांडला आहे. सामान्याना त्यांच्या आजोबा पन्जोबाची नावे आठवत नाहीत मात्र येथे तथाकथित या अडाणी गणल्या गेलेल्या माणसाने आपल्या जातीचा गावातीलच नव्हे तर परगांवातील कुटूबाचाही वंशवेलीचा नकाशाच डोळ्या समोर उभा केलेला आहे. केवळ माळी समाजाचा नाही तर परदेशी समाजाचाही मांडला आहे. गावात, खेड्यात जी संस्कृती नांदते ती जाती जातीत किंवा कुटूंबा कुटूंबात विभागून कधी वागतच नाही हेही ते स्पष्टं करून मांडतात. या उष्टा कालाच्या लेखना मागील उद्देश ते सुरवातीलाच मांडतात. त्यांचे आपल्या बोली विषयी, आपल्या गावा विषयी, आपल्या आप्ता विषयी आणि आपल्या कुटूंबा विषयी असलेले प्रेम शब्दाशब्दातून व्यक्त् होतांना दिसते. वयाच्या पंचाहत्तरीत प्रवेश केला असला तरी जगतांना आपण आपल्या गावाविषयी व कुटूंबा विषयीचे प्रेम सकारात्मकतेने कसे व्यक्त् करावे हे येणा-या पिढ्यांसाठी ते लिहून ठेवण्याचा त्यांचा हा प्रयत्न् आहे. या वयातही त्यांच्या उर्जेचे कौतूक करावे तेवढे थोडेच आहे. नामदेवांच्या काव्य् रचनेवर मी सन २००० पासूनच फिदा होतो. कधी काळी कविता फोनवरही ऐकावयास सांगत होतो. आठ दहा वर्षापूर्वी पाय मोडल्याने मी चाळीसगांव येथे कर्तार बापूंच्या दवाखाण्यात ऑपरेशन होवून ॲडमिट होतो. त्यांना ते कळल्यावर ते नवरा बायको जेवणाचा डबा घेवूनच दवाखाण्यात हजर झाले होते. बापूत्यांच्याच गावाचे व त्यांचेशी स्नेह असलेले. माझे व बापूंचे स्नेहसंबंध त्यांना माहित नसल्याने त्यांनी बापूनां माझा परिचय देवून विशेष काळजी घ्यावयास सांगितले. दवाखाण्यात सोबतीला असलेल्या बायकोलाही या परगावातील आमच्या स्नेहाचे नवल वाटले. असा हा माणसावर प्रेम करणारा नामदेव ! कथानकातील ठकूबाईची करडी शिस्त् वाखाणावी की तीची गुलामगिरीलाही लावविल अशा कठोर सासरवास करण्याच्या पद्धतीची निंदा करावी या सभ्रमांत ही कथा वेग घेते. गेल्या चार पिढयांचा सारा वंशावळीचा , केवळ वंशावळीचाच नव्हे तर त्यांच्या गेल्या पिढीतील आजीच्या तोंडून ऐकीव वर्तनाचा इतिहास मांडणं ते ही एवढ्या विस्ताराने ! हे काम काही ऐवढे सोपे नाही. स्वत:ला अडाणी समजणारा मात्र जगाला गिरणेचे अमृत पाणी पाजणारा, कष्टांची, नैतिकतेची शिकवण देणारा हा माणूस काही सामान्य् नाही ह्याची वाचकाला कल्पना येते. कारण एवढया शिकलेल्यांच्या पिढ्या जे काम करू शकल्या नाहीत ते या नामदेव महाजनांनी उष्टाकाल्याच्या निमित्ताने करून दाखविले आहे. उष्टाकाला ही खानदेशातील किंवा अहिराणी बोलीतील संकल्पना वा शब्द. इतर भाषिकांना तो कदाचित खटकेलही ! . खानदेशातील खेड्यामध्ये शेती करणारा हा माणूस असल्याने मधून मधून या कथानकात काही अहिराणी बोलीतील शब्दांची पेरणी ही झालेलीच आहे. एखाद्याने काही खाल्ल्यावर जे उरलेले अन्न् असते त्याला उष्टे असे म्हणतात. भाकरीला हाताने चुरून किंवा तूकडे करून त्यावर जो भाजीचा रस्सा टाकून तो खातात. हा झाला काला. आपली आई ठकूबाईच्या सासरवासाच्या छळासमोर हतबल झालेला दिर आपल्या भावजयीसाठी मुद्दाम जास्तीचा काला मोडून ताटात घेत असे आणि तो उरल्यावर तो काला,असे उष्टे किंवा शीळे ही ठकूबाई सूनेला खावयास देत असे. असाच उष्टा काला श्रीमंत परदेशीच्या घरात लहान मुलाचा शिल्लक असतांना भूकेपाटी, गरीबीपोटी आपणास खावयास मिळेल का ? अशा आशाळभूत नजरेने पाहणारा आपला पूर्वज व त्याचेवर माया दाखवित पुन्हा जास्तीची भाकरी देणारी परक्या जातीची ती श्रीमंत बाई.. हे सारे उष्ट्या काल्यावर जगलेली पिढीची ही कथा. केवळ कुटूंबातील जीद्द, चिकाटी, कठोरशासन, काटकसर, या सा-या गुणांच्या जोरावर काही पिढ्या उष्टाकाला खाणारेच न राहता जगाला पोटभर अन्न् पुरवणा-यात कसकसे प्रगत होत गेले याची ही प्रेरणादायी कथा.

ठकूबाईची कुटूंबाच्या प्रगतीसाठीची शिस्त् अन सावित्रीसाठी केलेला सारा कठोर असा सासरवास याची उत्तरे आपणास कथानकाच्या शेवटीही मिळतात. सावित्रीला ती आजारी असो वा उपाशी असो तीला दिवसभर ठकूबाई रात्रंदिन घाण्याच्या बैलासारखे सतत राबूवन घेत असे. तीच्या डोक्यात नव-याने एकदा लाकडाने तर दुस-यांदा कळयशीने मारले, दोनदा ती मरता मराता वाचली , तरीही शुद्धीवर आलेल्या जखमी, आजारी असली तरी त्या सावित्रीला दिवसभर कामावर पाठविणा-या या ठकूबाईचा रागही येतो. मात्र नव-याच्या हातचे मरण हे पवित्र कार्य समजणा-या या सावित्रीची कीव ही करावी वाटते!

या कुटूंबाची गरीबीमुळे पोटाची खळगी भरण्यासाठीची उसतोडीला जाण्याच्या अनुभवांचे चित्रण हे वाचकाला जवळून पाहावया मिळते.उसतोडीला जाणा-या कामगारांची ती परिस्थिती आजही बदललेली नाहीच. वाटेत दोन अपत्यांचा मृत्यू, त्यांचा दफनविधी वाटेतच करणे व पुढे कामासाठी सज्ज् राहणे. प्रवासात बैल मेला तर स्वत:च्या मुलांला एका बैलासोबत जूंपणे हे सारे उसतोडी कामगारांचे प्रश्न् आज तरी सुटलेत की नाही यावर सूज्ञ नक्कीच विचार करावयास लागतील अशी ही मजूरांच्या हालअपेष्टांची कथा.

गोवर्धनला सावित्री ही काळी बायको आवडत नाही म्हणून तीला सतत कुटूंबाकडूनच संपविण्याचे कारस्थान अन केवळ फुकटचा एक मूजर राबवावयास मिळतो म्हणून ठकूबाईचे काही काळापुरते तीच्या विषयीचे झुकते माप. रात्री उसतोडीहून डोक्यावर भारा आणतांना उशीर झाला तर दिवसभर कष्ट् करून थकलेल्या सावित्रीला थंडीत घराबाहेरच मातीवरच रात्रभर उपोशीपोटी ठेवणारी ही ठकूबाई. हे घराघरात पाहवयास मिळते. मात्र एवढे प्रखर चित्र डोळ्यासमोर उभे कुणी केलेले नाही. कारण ही घरातली गोष्ट्! कोण ती सांगणार ? अन जरी ती नामदेव महाजनांनी सांगितली असेल तरी तीला तिटकारा वाटावा असा भडकपणा नाही. उलट तीने गावातील एक कंगाल असलेले कुटूंब स्वत:च्या मार्गदर्शनाने, व्यवस्थापनाने, करड्या शिस्तीने त्याच गावातील उच्च् प्रतिष्ठीत घराणे म्हणून उभे केले याचा पुढील पिढयांचा अभिमानच आहे. सावित्री काळी, भोळी असली तरी ती स्त्री स्वातंत्र्यांची पुरस्कर्ती नाही तर ती त्यागाची मुर्ती म्हणूनच सगळा छळ सहन करीत आयुष्य् कंठते. सावित्री ही सासरवासा पोटी उपाशी राहून किंवा खरगटे वा दिराचा उष्ट्या काल्यावर जगते तर तीचा नवरा सुद्धा जरी तीचा तिटकारा करीत असला तरी तो सुद्धा भुकेपोटी लाचार होवून देवकोर बाई कडील लहानमुलाचा उष्टा काला खावून आपलीही भूक शमवितो. अन हेच कंगाल असलेले केवळ उष्ट्या काल्यावर हेच कुटूंब त्याच गावाची शान म्हणून नावारूपाला येते. त्याच मोठ्या दिव्यातून गेलेल्या कुटूंबातील एक सदस्य् नामदेव महाजन या सा-यांना देवत्वापर्यत पोचवितो. नामदेवाच्या मनात कुणविषयी आकस नाही. सारी मांडणी ही प्रेमापोटीची अन पवित्र भावनेतून केलेली आहे. नामदेव कठूबाईचे चुकले किंवा तिच्या मुलांचे चुकले असं कुठेही म्हणत नाही. अन या सा-यांचे समर्थनही करीत नाही. एवढेच काय गावातील सा-यांच जातीतल्या आणि पर जातीतल्या पात्राबाबतची नामदेवाची भावना ही सकारात्मकच आहे, आदर्शवतच आहे. तटस्थ् राहून कुलाचे गेल्या चार पिढ्यांचे, गावाचे , संस्कृतीचे बोधपर असे दर्शन त्यांनी घडविले आहे. काही ठिकाणी ,मात्र ते दुर्लक्षिण्या जोगे, अनपेक्षीत पणे नामदेव एवजी मी असेही झालेले आहे. विस-बाविस वर्षापुर्वी शेतकरी पुत्र नामदेव महाजन याचा कवितासंग्रह प्रकाशित झालेला होता. वाचकांना, नव्या पिढीला प्रेरक ठरावा असा हा त्यांच्या कुलाचा इतिहास त्यांनी तठस्तपणे त्यांच्या नामदेवीशैलीतच मांडलेला आहे. आता त्यांच्या या वयातील उमेदीला, त्याच्या प्रतिभेला शूभेच्छा !-



**डॉ. रमेश सूर्यवंशी,**
अभ्यासक, कन्नड.